|| श्री ||

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


**✻ सुविचार ✻**
प्रत्येक अडचणीत एक मोठा विजय लपलेला असतो.


अहिल्यानगर | सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ८५ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### डोमकावळे

भावना येतात दाटून
फुटत नाही शब्द !
आरोप प्रत्यारोपात
माणूस होतो स्तब्ध

दिसणं अन असणं
बरेच असते वेगळे
दिसायला बगळे
असतात डोमकावळे

# राज्यात १०० टक्के दुष्काळ जाहीर होणार

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची माहिती

**● मुंबई । वीरभूमी –**

महाराष्ट्रात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला आहे. राज्यातील अनेक भागांत खरीप पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस वाळले असून उसाचेही मोठे नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत प्रशासनाने राज्यात दुष्काळाचा 'ट्रिगर-१' लागू केला आहे. तसेच विरोधकांकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असतानाच सरकारने याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना दुष्काळग्रस्त भागांत प्रत्यक्ष जाऊन परिस्थितीचा आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. तीव्र टंचाईचा सामना करण्यासाठी महसूल, कृषी आणि जलसंपदा विभागाच्या माध्यमातून तातडीने उपाययोजना राबवण्याची चाचपणी राज्य सरकारकडून सुरू करण्यात आली आहे.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीही दुष्काळाच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतली आहे. शरद पवार २८ सप्टेंबर रोजी दुष्काळी भागाचा दौरा करणार आहेत. काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती.

राज्य सरकारमधील सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी परिस्थितीबाबत बोलताना सांगितले, एवढा दुष्काळ मी माझ्या आयुष्यात कधी बघितलेला नाही. कुठलीच पीके आलेली नाहीत. सोयाबीन, कापूस गेला उसाचे नुकसान झालं. दुष्काळ तर जाहीर होणारच आहे. एनडीआरएफच्या नियमांप्रमाणे शासन मदत करणारच आहे. दुष्काळ १०० टक्के जाहीर होणार आहे.



## SPOT NEWS

### टाटा ग्रुपमधील वाद आता कोर्टात जाणार

**● मुंबई –** टाटा ट्रस्टने टाटा सन्सच्या बोर्डाने केलेली एन. चंद्रशेखरन यांची चेअरमनपदावरील फेरनियुक्ती फेटाळली. टाटा सन्सच्या बोर्डाच्या बैठकीत झालेल्या ४-१ मतदानाला काही कायदेशीर अर्थ नाही. कारण कंपनीच्या नियमानुसार चेअरमन नियुक्तीसाठी टाटा ट्रस्टने नामनिर्देशित केलेल्या संचालकाची सहमती अनिवार्य आहे, जी पूर्ण झालेली नाही, अशी बाजू मांडण्यात आली. त्यामुळे आता हा वाद कोर्टात जाण्याची शक्यता आहे. टाटा सन्सच्या बोर्डाने एन. चंद्रशेखरन यांची पुढील ५ वर्षांच्या कार्यकाळासाठी चेअरमन पदावर निवड करण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. मात्र, टाटा सन्समधील सर्वाधिक भागधारक असलेल्या टाटा ट्रस्टने हा निर्णय बेकायदेशीर असल्याचे म्हटले. टाटा ट्रस्टने रविवारी एक प्रसिद्धीपत्रक जारी केले असून कंपनीच्या नियमानुसार टाटा ट्रस्टच्या नामनिर्देशित संचलाकांचा पाठिंबा कोणताही निर्णय घेण्यासाठी बोर्डाला दिलेला नाही, असे म्हटले आहे.

### 'लालपरी' च्या ताफ्यात येणार २०० अत्याधुनिक व्होल्वो बस

**● मुंबई –** महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांची विश्वासार्ह लोकवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाने आता लांब पल्ल्याच्या आरामदायी प्रवासाच्या क्षेत्रातही नवी झेप घेण्याची तयारी केली आहे. खासगी आराम बससेवांकडे वळणाऱ्या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी लवकरच महामंडळाच्या ताफ्यात स्वमालकीच्या २०० अत्याधुनिक, वातानुकूलित व्होल्वो बसेस दाखल करण्यात येणार आहेत.

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची पुतणी
# नीला विखे पाटील स्वीडनच्या खासदार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्राच्या नीला विखे पाटील यांची स्वीडनच्या संसदेत खासदार म्हणून निवड झाली. नीला विखे पाटील या महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ अशोक विखे पाटील यांच्या कन्या आहेत. स्टॉकहोम सिटी मतदारसंघातून त्यांनी ही निवडणूक जिंकली. त्यांचे कुटुंब महाराष्ट्रातील विखे पाटील फाउंडेशनशी जोडलेले आहे.



संसदेत निवड झाल्यानंतर नीला यांनी सांगितले की, स्वीडनच्या ३४९ सदस्यांच्या संसदेत काम करण्याची संधी मिळाल्याचा आनंद आहे. शहर आणि देशासाठी योगदान देण्यास आपण उत्सुक असल्याचेही त्यांनी म्हटले. बालकल्याण आणि पर्यावरण हे नीला यांच्या कामातील महत्त्वाचे विषय असणार आहेत. तसेच जे लोक मतदान करू शकत नाहीत, त्यांचाही आवाज संसदेत मांडण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. नीला यांचे महाराष्ट्राशी असलेले नातेही कायम आहे. मला भारतावर खूप प्रेम आहे आणि भारताशी माझे घट्ट नाते आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. नीला विखे पाटील या आशियातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पणती आहेत.

माजी केंद्रीय मंत्री दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांच्या त्या नात आहेत. नीला विखे पाटील यांनी आपल्या कुटुंबाचा सहकार आणि राजकीय वारसा पुढे नेत स्वीडनच्या संसदेत खासदार झाल्या आहेत. नीला यांचा जन्म स्वीडनमध्ये झाला. त्यांचे सुरुवातीचे बालपण मात्र अहमदनगरमध्ये घालवले. त्यांनतर गोथेनबर्ग स्कूल ऑफ बिझनेसमधून अर्थशास्त्र व कायद्यासह पदवी आणि एमबीए पूर्ण केले. तसेच मादीद्र येथील युनिव्हर्सिटी डी कॉम्प्ल्युटेन्स येथूनही एमबीए पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी स्वीडनचे माजी पंतप्रधान स्टीफन लोफवेन यांच्या कार्यकाळात त्यांनी पंतप्रधान कार्यालयात वित्त, कर आणि गृहनिर्माण क्षेत्रांसाठी सल्लागार म्हणून काम केले.

# एक लाखांची लाच स्वीकारतांना पाथर्डीचे पोलीस अंमलदार विनोद मासाळकर एसीबीच्या जाळ्यात

## तडजोडीनंतर २ लाख १५ हजारांवर सौदा | गुन्हा दाखल करुन ताब्यात घेतले

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पाथर्डी पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अंमलदाराने एका व्यक्तीच्या नोकरावर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल न करण्यासाठी तब्बल पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) नाशिक पथकाने सापळा रचून तडजोडीनंतर ठरलेल्या २ लाख १५ हजार रुपयांपैकी एक लाख रुपये स्वीकारताना पोलीस अंमलदार विनोद शिवाजी मासाळकर (वय ३७) याला ताब्यात घेतले.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांच्या हॉटेलवर काम करणाऱ्या नोकराचा पाथर्डी गावातून मोटारसायकलवरून जात असताना एका अनोळखी ट्रकचालकाशी गाडीला कट लागल्याच्या कारणावरून वाद झाला. त्यानंतर दोघांमध्ये मारामारी झाली. या प्रकरणात संबंधित नोकराविरुद्ध 'हाफ मर्डर' व रॉबरीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात आल्याचा तक्रारीत उल्लेख आहे.

यानंतर तक्रारदार यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस अंमलदार विनोद मासाळकर यांची भेट घेतली. त्यावेळी गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल न करता वरिष्ठांशी बोलून सौम्य स्वरूपाचा मारामारीचा गुन्हा दाखल करण्यासोबतच आरोपीला लवकर जामीन मिळवून देण्यास व तपासात मदत करण्याच्या मोबदल्यात पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे.

लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी १८ सप्टेंबर २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर १९ सप्टेंबर रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात आली. पडताळणीदरम्यान लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पंचांसमक्ष तडजोड करण्यात आली. त्यात २ लाख १५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले.

एसीबीच्या पथकाने सापळा रचला असता मासाळकर याने मागणी केलेल्या रकमेपैकी एक लाख रुपये स्वीकारले. त्यानंतर पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीमध्ये Vivo V५० मोबाईल, १५ हजार १३० रुपये रोख रक्कम आणि एटीएम कार्ड मिळून आल्याची माहिती देण्यात आली आहे.

या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपीची घरझडती घेण्याची कार्यवाहीही सुरू करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक संतोष पैलकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाई पथकात पोहवा दिनेश खैरनार, पोहवा अविनाश पवार आणि पोशि योगेश शिंदे यांचा समावेश होता. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सविता तांबे करीत आहेत. या कारवाईसाठी नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक प्रदीप मैराळे आणि अपर पोलीस अधीक्षक कविता फडतरे यांचे मार्गदर्शन लाभले.

# भारनियमन आणि पाणीटंचाईच्या बाबतीत गांभीर्याने उपाययोजना कराव्यात

## पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील । जनता दरबारामध्ये जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या

**● शिर्डी । वीरभूमी –**

टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन महसूल, महावितरण आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने लोकांच्या भावना समजून घ्याव्यात. ग्रामीण भागातील भारनियमन कमी करण्यासाठी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी गांभीर्याने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. पंचायत समितीच्या माध्यमातून टँकरचे सुयोग्य नियोजन करून पाणीपुरवठा करण्याबाबतही चोख व्यवस्था करावी, असे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात दुपारी २ ते रात्री ८ वाजेपर्यंत जनता दरबाराच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांच्या प्रश्नांची निवेदने स्वीकारली.

राहता उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, श्रीरामपूर उपविभागीय अधिकारी किरण सावंत, श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंद वाघ, संगमनेरचे तहसीलदार श्री. मुंडे, राहता तहसीलदार श्री मोरे, राहुरी तहसीलदार यांच्यासह कृषी, विभाग, अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

नागरिकांची निवेदने स्वीकारल्यानंतर अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन प्राप्त झालेल्या नागरिकांच्या सर्व निवेदनांवर तात्काळ कार्यवाही करून, त्यांना त्याबाबतचे अहवाल कळवावे, असे निर्देश दिले. या बैठकीस सर्व विभागांचे आधिकारी उपस्थित होते.

जनता दरबारामध्ये प्रामुख्याने भारनियमनाच्या मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेल्या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन मंत्री विखे पाटील यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना या संदर्भात अतिशय जागरूकतेने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. बहुतेक ठिकाणी रोहित्रांचे प्रश्न निर्माण झाल्याने भारनियमनाचे प्रमाण वाढले आहे. अनेक गावांमध्ये कृषी आणि गावठाण फिडर एकत्रित झाल्यामुळे सुद्धा भारनियमनाचे संकट वाढल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. या संदर्भात वीज वितरण कंपनीच्या सर्व अधिकाऱ्यांनी आपल्याकडील जबाबदारी असलेल्या गावांचा प्रत्यक्ष सर्व्हे करून सविस्तर अहवाल सादर करावा. दिनांक २४ सप्टेंबर रोजी वीज वितरण कंपनीची स्वतंत्र बैठक घेऊन पुन्हा त्याबाबतचा सविस्तर आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सप्टेंबर महिन्यामध्येही काही तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. याबाबत मागील बैठकांमध्ये टँकरच्या नियोजनाबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. गावनिहाय त्याचे काटेकोर वेळापत्रक तयार करावे आणि मागणीप्रमाणे टँकर कसे उपलब्ध करून देता येतील, याचे काम अतिशय संवेदनशीलतेने सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी करावे. प्रामुख्याने संगमनेर तालुक्यात टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात होत असून, त्या बाबतीतही योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.



जलसंपदा विभागाच्या माध्यमातून ठरलेल्या नियोजनाप्रमाणे पाण्याचे आवर्तन सुरू आहे. पाण्याचा कोणताही अपव्यय होणार नाही याची दक्षता अधिकाऱ्यांनी घ्यावी. ज्या भागांमध्ये आवर्तनाचा कालावधी संपला असेल, तिथे कालव्यांवरील अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू ठेवावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या उपलब्ध निधीतून रस्त्यांची कामे दर्जेदार कशी होतील याची दक्षता घ्यावी; या योजनेचा स्वतंत्र आढावा घेणार असल्याचेही मंत्री विखे पाटील म्हणाले. प्रत्येक तालुक्यात जाऊन टंचाई परिस्थितीचा आढावा आपण स्वतः घेणार असून, टंचाईच्या संदर्भातील गावनिहाय भेटींचा प्राथमिक अहवाल अधिकाऱ्यांनी तयार ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# SPOT NEWS

## भीमराजे युवा प्रतिष्ठानचे मोफत नेत्र तपासणी शिबिरात ३१५ नागरिकांनी घेतला लाभ

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

केडगाव येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भीमराजे युवा प्रतिष्ठानच्या वतीने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा परिसरातील ३१५ नागरिकांनी लाभ घेतला, अशी माहिती स्वरा सागर भिंगारदिवे यांनी दिली. सामाजिक बांधिलकी आणि आरोग्यसेवेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा, विशेषतः महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली तसेच गरज असलेल्या रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरावेळी भीमकन्या स्वरा सागर भिंगारदिवे, डॉ. रमा कलंत्री, प्रतिष्ठानचे अध्यक्ष भैय्या शिरसाठ, डॉ. भूषण जाधव यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना स्वरा भिंगारदिवे म्हणाल्या, उत्सव कोणताही असो, सर्व जाती-धर्मातील नागरिकांना सोबत घेऊन सामाजिक सलोखा जपला पाहिजे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे विचार प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. उत्सवाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. शिबिरात परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने नेत्रतपासणी करून घेतली. आरोग्यसेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले. या कार्यक्रमास कुसुम कांबळे, नवनाथ पुलावले, पौर्णिमा ठोकळ, आशा आल्हाट, सुनीता तिजोरे, हिराबाई घंगाळे, संगीत कदम, शोभा निकाळजे, सारिका सूर्यवंशी, मीना भिंगारदिवे, सुरेश भोसले, नारायण कांबळे, विनोद निकाळजे, विठ्ठल निकाळजे, आशा शिरसाठ, निर्मला जाधव, लक्ष्मण पुलावले, सचिन लोंढे, छाया आल्हाट यांच्यासह प्रतिष्ठानचे अध्यक्ष भैय्या शिरसाठ, अतुल भिंगारदिवे, शुभम शिरोळे, मोहित आल्हाट, अनिकेत आरोळे, शिवम जाधव, सुरज रोकडे, साहिल खंडागळे तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## श्री समर्थ प्रशालेत हिंदी दिवस उत्साहात साजरा

● **अहिल्यानगर । वीरभूमी-**

श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळ, अहिल्यानगर अंतर्गत असलेल्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथे हिंदी राष्ट्रभाषा दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन, ईशस्तवन आणि स्वागतगीताने झाली. प्रशालेच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या सौ. वसुधा जोशी यांनी प्रास्ताविकात हिंदी दिवसाचे महत्त्व विशद केले. हिंदी दिवस दरवर्षी १४ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हिंदी ही देशाला एकत्र बांधणारी, संवाद सुलभ करणारी आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करणारी भाषा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच हिंदी साहित्य समृद्ध करण्यामध्ये अनेक कवी व साहित्यिकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यानंतर प्रमुख अतिथी सौ. श्रुती कुलकर्णी यांचा परिचय करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारी नाटिका सादर केली. तसेच हार्मोनियम व तबल्याच्या साथीने देशभक्तीपर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विविध सांस्कृतिक सादरीकरणांमधून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेप्रती असलेला आदर आणि अभिमान व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी प्राचार्या सौ. वसुधा जोशी व पर्यवेक्षिका सौ. शारदा होशिंग यांचे मार्गदर्शन लाभले. हिंदी विभाग प्रमुख श्रीमती नारळे, सहाय्यक शिक्षिका सौ. योगिता कुलकर्णी व सौ. वैष्णवी साबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. अमोल बागुल यांनी विशेष परिश्रम घेतले, तर कु. स्वाती घुले यांनी आकर्षक फलकलेखन व कार्यक्रमपत्रिका तयार केली. सूत्रसंचालन कु. कादंबरी दीपक बनकर हिने केले, तर कु. संस्कृती शिंदे हिने आभार मानले.

### संजीवनी युनिव्हर्सिटीच्या दोन टीमचे

# राष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धेतील स्थान टॉप टेन मध्ये

**आयबीएम नॅशनल हॅकाथॉन स्पर्धेत ४०० टीम मधुन अव्वल**

● **कोपरगाव । वीरभूमी-**

संजीवनी युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी मधील आर्टीफिशियल इंटीलिजन्स अँड मशीन लर्निंग (एआयएमएल) विभागातील दोन टिमने कोयंबतुर (तामिळनाडू) येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आयबीएम नॅशनल हॅकाथॉन २०२६ या अभियांत्रिकी विध्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवुन देशातील सुमारे ४०० टीममधुन पहिल्या सर्वोत्कृष्ट १० टीममध्ये स्थान मिळविले. संजीवनी युनिव्हर्सिटी जरी ग्रामीण भागात असली तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे सिध्द केले. दोनही टीमच्या दोनही प्रोजेक्टवर पुढील संशोधन करण्यासाठी आयबीएम प्रत्येकी५ लाख रुपयांचे अर्थ सहाय्य देण्याचे नमुद केले आहे.

आयबीएम नॅशनल हॅकाथॉन या स्पर्धेत विद्यार्थी वास्तविक उद्योग क्षेत्रातील आव्हानांवर नाविन्यपूर्ण कल्पना आणि सहकार्याच्या माध्यमातून उपाय शोधतात आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानांचा प्रत्यक्ष परिचय पंचासमोर सादर करतात. प्रथम उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांकडून विविध वास्तविक समस्यांची यादी दिली जाते.



या स्पर्धेत नेहा संजय चव्हाण, पायल सतीश गायकवाड, ओंकार दत्तात्रय वाकचौरे व अपर्णा प्रकाश मतसागर यांच्या टीमने 'सायबर सिक्युरिटी' या समस्येवर सादरीकरण दिले तर दिगंबर अर्जुन महाजन, रोहित संदीप तुपे, अजित देविदास नवले व आदित्य संतोश गांगुर्डे यांच्या टीमने ' रोड सेफ्टी इन इंडिया' या समस्येवर सादरीकरण दिले. परीक्षकांनी नावीण्यपूर्ण कल्पना, तांत्रिक गुणवत्ता, समस्या सोडविण्याची क्षमता, व्यावहारीक उपयोगीता आणि सादरीकरण कौशल्य या निकषांवर आधारीत दोनही टीमला देशातील पहिल्या दहा टीममध्ये निवड केली. या विध्यार्थ्यांना प्रा. सौहरद्या गायेन व प्रा. शिवानी पामु यांनी मार्गदर्शन केले.

संजीवनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आयबीएम नॅशनल हॅकाथॉन २०२६ सारख्या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत देशातील अव्वल दहा संघांमध्ये स्थान मिळवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, कल्पकता आणि जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक क्षमता सिद्ध केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, सायबर सुरक्षा आणि सामाजिक समस्यांवरील तंत्रज्ञानाधारित उपाययोजनांच्या माध्यमातून त्यांनी नवोन्मेशाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. हे केवळ विद्यार्थ्यांचे यश नसून संजीवनीच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि संशोधन संस्कृतीची राष्ट्रीय पातळीवरील पोचपावती आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना जागतिक संधी उपलब्ध करून देणे आणि 'रूरल टू ग्लोबल' हे स्वप्न साकार करणे, हीच संजीवनीची भूमिका आहे. भविष्यातही संजीवनीचे विद्यार्थी ज्ञान, संशोधन आणि नवोन्मेशाच्या बळावर देशाच्या तंत्रज्ञान प्रगतीत मोलाचे योगदान देतील, असा मला विश्वास असल्याचे संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे यांनी सांगितले.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तर प्रेसिडेंट अमित कोल्हे यांनी सर्व विद्यार्थ्यांचा छोटेखानी कार्यक्रमात सत्कार केला. यावेळी व्हाईस चांसलर डॉ. ए.जी. ठाकुर, डीन डॉ. कविथा राणी, विभाग प्रमुख डॉ. देवयानी जाधव, प्रा. सौहरद्या गायेन व प्रा. शिवानी पामु उपस्थित होते.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्यपदी डॉ. सुशील एन. बेणके यांची निवड

● **अकोले । वीरभूमी-**

शिक्षण, विज्ञान व करिअर मार्गदर्शन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. सुशील एन. बेणके यांना महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ज अग्रीकल्चरचे सदस्यत्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षण, उद्योग, कौशल्य विकास आणि उद्योजकता क्षेत्राला राज्यस्तरीय व्यासपीठाशी जोडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



डॉ. सुशील एन. बेणके हे पीएचडी (केमिस्ट्री) आयसर पुणे असून त्यांनी शिक्षण व विज्ञान क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य केले आहे.

रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे सदस्य म्हणून कार्य करताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जे ई ई, निट, आयसर तसेच विविध उच्च शिक्षणाच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच कौशल्य विकास, करिअर मार्गदर्शन आणि उद्योग-शिक्षण क्षेत्रातील समन्वयासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत.

ऊर्जा आय आय टी अकेडमी चे संचालक म्हणून त्यांनी ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणपद्धती, वैयक्तिक मार्गदर्शन आणि राष्ट्रीय स्तरावरील करिअर संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. तसेच विज्ञान व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून आणण्यासाठी विविध उपक्रम त्यांनी राबविले आहेत.

रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री इंग्लंडचे असोसिएट मेंबर असलेले डॉ. बेणके यांच्या महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स मधील सहभागामुळे शिक्षण, विज्ञान, उद्योग, कौशल्य विकास आणि उद्योजकता या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होईल.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स,इंडस्ट्रीज ॲग्रीकल्चर हे महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचे व्यासपीठ असून, या संस्थेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील उद्योग व उद्योजकांच्या प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तसेच युवकांना उद्योग व करिअरच्या नव्या संधींशी जोडण्यासाठी कार्य करण्याचा मानस डॉ. बेणके यांनी व्यक्त केला आहे.

## नवरात्रोत्सवादरम्यान पाथर्डी आगाराने मोहटादेवी गडावरून लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्याची देवस्थान समितीची मागणी

● **पाथर्डी । वीरभूमी-**

शारदीय नवरात्रोत्सवासाठी राज्य परिवहन महामंडळाने मोहटा देवीसाठी लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू कराव्या. नव्या बस गाड्यांमुळे भाविकांची चांगली सोय झाली आहे, अशी माहिती देवस्थान समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी दिली.



पाथर्डी आगारामध्ये नवीन बस गाड्या आल्यानंतर पूजन करण्यासाठी सर्व गाड्या मोहटादेवी गडावर नेण्यात आल्या देवस्थान समितीतर्फे अशा सर्व गाड्यांचे पूजन करण्यात येऊन सन्मान केला. देवस्थान समितीचे ज्येष्ठ सेवेकरी अंकुश ठोंबरे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. देवस्थान समितीचे पुजारी बाळासाहेब क्षीरसागर यांनी पूजा विधीचे पौरोहित्य केले.

नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नंदकुमार शेळके, आगारप्रमुख अमित बनसोडे, वाहतूक निरीक्षक गोवर्धन दहिफळे, बाळासाहेब सोनटक्के, एसटी बँकेचे संचालक दत्तात्रय खेडकर, हास्य कलाकार प्रा. राजीव सुरवसे, माजी उपसभापती विष्णुपंत अकोलकर यासह विविध कार्यकर्ते, पदाधिकारी, देवस्थान समितीचे कर्मचारी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माहिती देताना भणगे म्हणाले, एसटीच्या कोणत्याही आगाराकडून कायमस्वरूपी मोहटादेवी गडासाठी बससेवा सुरू केल्यास देवस्थान समितीकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. राज्याच्या विविध भागातून देवस्थान समितीला भेट देणाऱ्या भाविकांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. बहुतेक भाविकांना पाथर्डीला जाऊन गाडी पकडावी लागते. त्याऐवजी लांब पल्ल्याच्या गाड्या मोहटा देवस्थान समितीतून सुटल्यास थेट प्रवासाची भाविकांची सोय होणार आहे. शारदीय नवरात्र उत्सवाची तयारी विश्वस्त मंडळ व यात्रा प्रशासनाच्या सूचनेनुसार युद्ध पातळीवर सुरू असून यंदा पार्किंग साठी मंदिराच्या बाजूला मोठी जागा उपलब्ध झाल्याने अनेक वाहनांसाठी पार्किंगची सुविधा उपलब्ध झाली आहे. असे भणगे म्हणाले.

शारदीय नवरात्रोत्सवासाठी विभाग नियंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली नगर विभागाने शंभरहून अधिक गाड्यांचे नियोजन पूर्ण केले आहे. प्रवाशांची संख्या वाढल्यास ऐनवेळी वाढीव गाड्या उपलब्ध होतील. आगारामध्ये नव्याने पाच गाड्यांची भर पडल्याने नवरात्रोत्सवासाठी गाड्यांची चांगली उपलब्धता झाली आहे. असे आगर प्रमुख अमित बनसोडे म्हणाले.

# शिवदुर्गच्या ट्रेकिंगमधून सुदृढ युवा पिढी घडतेय

**राजेश इंगळे । तरुणांच्या साथीने गडकिल्ले, वारसा-संस्कृती जपण्याचा निर्धार; शिवदुर्गची ८ वी वार्षिक सभा उत्साहात**

● **श्रीगोंदा । वीरभूमी-**

मोबाईलच्या आहारी गेलेल्या तरुणाईला सह्याद्रीच्या डोंगररांगांकडे वळवत शारीरिक सुदृढतेसोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचा इतिहास आणि वारसा जपण्याचे काम शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरू आहे. ट्रेकिंगच्या माध्यमातून सुदृढ युवा पिढी घडविण्यासोबतच तरुणांच्या साथीने गडकिल्ले व वारसा-संस्कृतीचे संवर्धन करण्याचा निर्धार करण्यात आला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष राजेश इंगळे यांनी सांगितले.

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनची आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा बेलवंडी कोठार येथील काशीबारव परिसरातील साई मंगल कार्यालयात राजेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी नगर व पुणे जिल्ह्यातील संस्थेचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी अजित दळवी यांनी प्रास्ताविक केले. संस्थेच्या वर्षभरातील विविध उपक्रमांचा आढावा सचिव सोमेश शिंदे यांनी मांडला. उपाध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कळमकर व संकेत नलगे यांनी तरुणांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन मारुती वागसकर व प्रा. भरत खोमणे यांनी केले. नवनाथ गोरे यांनी आभार मानले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकोटांची पायधूळ घेत तरुणांनी सह्याद्रीशी नाते जोडावे, मोबाईलपासून काही काळ दूर राहून शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवावे, तसेच गडकिल्ले आणि ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे विविध ठराव सभेत संमत करण्यात आले.

'शिवदुर्ग' परिवारातील प्रत्येक व्यक्ती कामातून आणि शिवविचारांतून मोठी आहे. पुढील पिढीसाठी उरलेला ऐतिहासिक वारसा जपणे ही आपली जबाबदारी असून, कोणतेही स्वार्थाचे गणित न ठेवता तरुण पिढी हे काम करीत आहे, असे यावेळी सांगण्यात आले. लहान वयात वारसा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या तनिष्का मोरे, त्रिवेणी कडूस, प्रतिभा इथापे, दिगंबर भुजबळ, सचिन भोसले व चेतन चौधरी यांना 'आदर्श शिवदुर्ग मावळा व रणरागिणी' राज्यस्तरीय सन्मान देऊन गौरविण्यात आले.



सह्याद्रीची भ्रमंती करणारी आणि त्याचबरोबर स्थानिक ऐतिहासिक वारसा जपणारी तरुणाई घडविण्याचे काम शिवदुर्ग परिवार करीत आहे. कार्यक्रमाला साईकुमार शिंदे, दिगंबर भुजबळ, अमोल बडे, रमेश चांदगुडे, तारा चांदगुडे, सुनील मोरे, अर्चना मोरे, मिठू लंके, सुचित्रा दळवी, त्रिवेणी कडूस, विजया लंके, दिनेश अडसूळ, राकेश अग्रवाल, तुषार चौधरी, प्रणव गलांडे, चेतन चौधरी, आविष्कार इंगळे, अक्षिका इंगळे व स्वाती मुळे यांच्यासह सदस्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे नियोजन ईश्वर कोठारे, अक्षय ओहळ, सागर शिंदे, नीरज पाडळे, सोनू शिंदे व गौतम निकम यांच्या नियोजन पथकाने केले.

## SPOT NEWS



## गणेशोत्सवासाठी राजूर पोलिसांचा रूट मार्च

● **अकोले । वीरभूमी–**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी शनिवारी राजूर शहरातून पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला. उत्सव काळात पोलिस यंत्रणा सज्ज असल्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशानुसार विभागीय अधिकारी सोमनाथ वाकचौरे व पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राजुर बाजारपेठेतून रूट मार्चला सुरुवात झाली. दत्त मंदिर, मुख्य बाजारपेठ, महादेव मंदिर पिचड साहेब बंगला रोडमार्गे पुन्हा राजूर पोलीस ठाणे असा मार्ग होता. रूट मार्चमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक परसराम तागड पोलीस उपनिरीक्षक १७ पोलीस अंमलदार आणि २३ होमगार्ड, असे एकूण ४२ जवान सहभागी झाले. गणेशोत्सवात अनुचित प्रकार टाळण्यासाठी प्रमुख चौक, बाजारपेठ, संवेदनशील भाग व गणेश मंडळांच्या परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. नागरिकांनी निर्भयपणे उत्सव साजरा करावा, तसेच अफवा व गैरसमजांवर विश्वास न ठेवता संशयास्पद बाब आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, गणेशोत्सव शांततेत साजरा करा गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे. डीजेवर बंदी असल्याने पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी दिला.

## नानासाहेब घोडके यांचे निधन

● **अकोले । वीरभूमी –**



तालुक्यातील उंचखडक खुर्द येथील नानासाहेब पंढरीनाथ घोडके वय वर्ष ३९ यांचे नुकतेच ह्रदय विकाराच्या तिव्र धक्क्याने अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात, आई, वडील, पत्नी, दोन मुली, भाऊ, भावजय, दोन पुतण्या, चार बहिणी असा परिवार आहे. इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या नानासाहेबांनी जे सी बी चा हेल्पर ते, ड्रायव्हर व आता, दोन जे सी बी चा व एका पोकलैंडचा मालक एक नव उद्योजक अशी गगनभरारी नानासाहेबांनी घेतली होती. गावातील तरुणांचा गळ्यातील ताईत बनलेल्या नानासाहेबांचे असं अचानक जाणं संपूर्ण उंचखडक खुर्द वासियांना तसेच कुटुंबियंना व नातेवाईकांना अतिशय दुःखदायक घटना आहे.नानासाहेबांचा अकोले, संगमनेर तालुक्यात खुप मोठा जनसंपर्क होता. गावात कुणावर पण कसला प्रसंग आला तर नानासाहेब संकटमोचक म्हणून नेहमी हजर असायचे, माजी आमदार वैभवराव पिचड यांचे अत्यंत विश्वासू शिलेदार म्हणून त्यांची ओळख होती. कै. नानासाहेब यांच्या जाण्याने मित्र परिवार एका परोपकारी मित्राला मुकला आहे.

# पारनेर शहर परिसरात बिबट्याचा मुक्त संचार

### एक पारडी आणि १५ ते २० कोंबड्यांचा फडशा । वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्याला बिबट्याची हुलकावणी

● **पारनेर । वीरभूमी –**

पारनेर शहरालगतच्या विधाटे वस्ती, वैद्य वस्ती, खोडदे वस्ती, मते मळा, महाजन मळा, कानिफनाथ मळा आणि वरखेड मळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून दोन ते तीन बिबट्यांचा मुक्त संचार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बिबट्यांच्या वावरामुळे वाड्यावस्त्यांवरील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील दोन–तीन दिवसांपूर्वी शेतकरी शांताराम नामदेव वैद्य यांच्या वैद्य वस्ती येथील घरासमोरील झाडावर असलेल्या कोंबड्यांवर बिबट्याने हल्ला करून त्यांचा फडशा पाडला. त्याच परिसरात वैद्य यांच्या एका म्हशीच्या पारडीवरही बिबट्याने हल्ला करून ती ठार केली. या घटनेनंतर वैद्य वस्ती परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वैद्य वस्तीवरील सामाजिक कार्यकर्ते सागर वैद्य यांनी या घटनेची माहिती वन विभागाला दिली होती त्या नंतर वन



विभागाने वैद्य वस्ती परिसरात बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावला आहे. मात्र अद्याप बिबट्या पिंजऱ्यात अडकलेला नाही.


दरम्यान, काल दि. १९ रोजी रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास कानिफनाथ मळा, लोणी रोडलगत विद्या बापू गाडगे यांच्या घराशेजारी बिबट्याने धुमाकूळ घातल्याचे सांगण्यात येत आहे. मागील दोन–तीन दिवसांत कोंबड्यांच्या पिंजऱ्यातील सुमारे १० ते १२ कोंबड्या बिबट्याने फस्त केल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली.या परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने रात्रीच्या वेळी शेतात पिकांना पाणी देण्यासाठी जाण्यास शेतकरी धजावत नाहीत. त्यातच महावितरणकडून सुरू असलेल्या भारनियमनामुळे वाड्यावस्त्यांवरील वीज अनेकदा बंद असते. त्यामुळे रात्रीच्या वेळी परिसरात अंधाराचे साम्राज्य निर्माण होत असून बिबट्याच्या भीतीत आणखी भर पडली आहे.

वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरे लावण्याबरोबरच परिसरात गस्त वाढवावी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे.

# हिंदू समाजाला असहिष्णु ठरविणे अयोग्य : गायकर

● **अकोले । वीरभूमी –**

माजी उपराष्ट्रपती हामिद अन्सारी यांनी हिंदू दक्षिणपंथीय सांप्रदायिकतेचा भारताला धोका असल्याचे सांगत माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जुन्या विधानाचा संदर्भ दिल्यानंतर या वक्तव्यावर विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री तथा प्रवक्ते शंकर गायकर यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. अन्सारी यांनी १८ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे ए. जी. नूरानी यांच्या स्मृतिव्याख्यानात हे भाष्य केले होते.



पत्रकारांशी बोलताना गायकर म्हणाले, हिंदू समाजाला असहिष्णू ठरविण्याचा आणि त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. भारताची हजारो वर्षांची संस्कृती ही सहिष्णुता, सर्वसमावेशकता आणि विविधतेचा स्वीकार करणारी आहे. त्यामुळे संपूर्ण हिंदू समाजाच्या राष्ट्रभावनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नाही. जर हिंदू समाज असहिष्णू असता, तर भारतात विविध धर्म–संप्रदायांना शतकानुशतके स्थान मिळाले नसते. आज देशातील विविध समाजघटकांना मिळणारे घटनात्मक अधिकार, सामाजिक आणि शैक्षणिक सुविधा तसेच सार्वजनिक जीवनातील सहभाग ही भारतीय लोकशाहीची वस्तुस्थिती आहे. नेहरूंच्या भूमिकेवरही गायकर यांनी प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या धोरणांमध्ये एका विशिष्ट समाजाला झुकते माप दिल्याची भावना हिंदू समाजामध्ये निर्माण झाली. या धोरणांचा ऐतिहासिक परिणाम म्हणून देशाची फाळणी झाली, असा आमचा राजकीय व ऐतिहासिक आक्षेप आहे. मात्र आजच्या भारतातील प्रश्नांचा विचार करताना वर्तमान संविधानिक व्यवस्था आणि सर्व नागरिकांची समानता हीच केंद्रस्थानी असली पाहिजे. उपराष्ट्रपतीसारख्या घटनात्मक पदावर काम केलेल्या व्यक्तीकडून देशातील एका मोठ्या समाजाच्या राष्ट्रवादी विचारांकडे संशयाने पाहणे दुर्दैवी आहे. त्यांच्या सार्वजनिक भूमिकांबाबत यापूर्वीही मतभेद झाले आहेत. आजही त्यांच्या वक्तव्यांमधून एका विशिष्ट दृष्टिकोनाला अधिक महत्त्व दिले जात असल्याची भावना निर्माण होते. हिंदू राष्ट्रवाद म्हणजे कोणत्याही धर्माविरुद्ध द्वेष नव्हे. भारताच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना ही या देशाच्या परंपरा, इतिहास आणि सांस्कृतिक सातत्याशी जोडलेली आहे. हिंदू समाजाला लक्ष्य करण्याऐवजी सामाजिक सलोखा, समान नागरिकत्व आणि राष्ट्रहित यावर संवाद व्हायला हवा, असेही गायकर यांनी स्पष्ट केले.

## शस्त्र प्रदर्शनाच्या माध्यमातून नव्या पिढीला प्रेरणा व इतिहासाची ओळख : आ. मोनिका राजळे

● **पाथर्डी । वीरभूमी –**

स्वराज्याची शपथ घेत छत्रपतींनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्या काळामध्ये अत्यंत उपयोगी व प्रभावी अशी शस्त्रे तयार करून वापरली गेली. यातील काही शस्त्रांची व गड किल्ल्यांची ओळख शहरवासीयांना संत वामनभाऊ मंडळांनी उपलब्ध करून दिली. नव्या पिढीला इतिहासाची ओळख व प्रेरणा यामुळे मिळणार आहे, असे मत आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केले.

गणेशोत्सवानिमित्त शहरातील शिवशंभु विचार मंच व संत वामनभाऊ तरुण मंडळाने राज्यातील सर्वात मोठ्या अशा शस्त्र नाणी व गडकिल्ल्यांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ प्रदीप काटे, मंडळाचे अध्यक्ष सचिन नागापुरे, डॉ. मृत्युंजय गर्जे, संतोष गायकवाड, भाजपचे तालुकाध्यक्ष धनंजय बडे, सिद्धार्थ गायकवाड, सुभाष भागवत, सुजल गाडे, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्ष ज्योती शर्मा, डॉ. जगदीश मुने, प्राचार्य अजय भंडारी, भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस नितीन एडके, शिक्षक सेना तालुकाप्रमुख नंदकुमार डाळिंबकर, तालुका संघाचे अध्यक्ष संदीप पठाडे, पालिकेतील गटनेत्या डॉ शारदा गर्जे, सुरेखा नागापुरे, विष्णुपंत अकोलकर, आदी उपस्थित होते.

तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री यांच्या हस्ते उद्घाटन झाले. राज्यातील सर्वात मोठे शस्त्र प्रदर्शन असे वर्णन संयोजका कडून केले जात असून तीन दिवस चालणाऱ्या प्रदर्शन साठी शहरातील विद्यार्थ्यांसह सर्व थरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे.

आमदार राजळे म्हणाल्या, तालुक्यात अशा स्वरूपाचे भव्य प्रदर्शन प्रथमच आयोजित झाले असल्याने इतिहासाचा जागर करण्याची सुवर्णसंधी वामन भाऊ तरुण मंडळाच्या माध्यमातून लाभली आहे. शालेय जीवनामध्ये काही शस्त्रास्त्रांची छायाचित्रे पुस्तकात बघितली, प्रदर्शनामध्ये ती प्रत्यक्षात बघायला मिळाली. जिल्ह्यात प्रथमच या मंडळांनी १११ किलो कागदाच्या रद्दी पासून तयार केलेला पर्यावरण पूरक गणेशोत्सवाची मूर्ती उत्सवाचे आकर्षण ठरले आहे. टाळ पथकाच्या माध्यमातून उपनगरातील महिलांचा सुद्धा गणेशोत्सवामध्ये सक्रिय सहभाग सकारात्मकता वाढवणारा ठरत आहे. प्रबोधनात्मक व धर्म विचारांची पाठराखण करत नव्या पिढीला उत्सवाचे महत्त्व पटवण्यासाठी सर्वच मंडळातील जेष्ठ सदस्यांनी पुढे यावे. उत्सवातील बीभत्स पणा टाळून उत्सवाचे पावित्र्य राखण्याचे काम शहरातील विविध मंडळांकडून होत आहे.

प्रास्ताविक भूषण नागपुरे, सूत्रसंचालन सुभाष गव्हाणे तर आभार सिद्धार्थ गायकवाड यांनी मानले.

# निसर्गाचा कोप म्हणजेच आपल्याच कर्माचे फळ असते : महंत रामगिरी महाराज

### साकरवाडी येथील गोदावरी बायो रिफायनरी लिमिटेडच्या गणेश उत्सव मंडळाच्यावतीने श्रीमद् भागवत कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद

● **कोपरगाव । वीरभूमी–**

जगात होत असलेली अतिवृष्टी, भूकंप, महापूर, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्ती म्हणजे निसर्गाचा कोप आहे. मनुष्य ज्या प्रकारची क्रिया करतो, त्याची प्रतिक्रिया प्रकृतीतून येत असते. आपल्या कर्माचे फळ आपल्यालाच भोगावे लागते असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.

गोदावरी बायो रिफायनरी लिमिटेड, साकरवाडी गणेश उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित श्रीमद् भागवत कथेत महंत रामगिरी महाराज यांनी पंचम, षष्ठ, सप्तम, अष्टम आणि नवम स्कंधाचे निरूपण केले. यावेळी त्यांनी मानवी जीवन, कर्मसिद्धांत, धर्म–अधर्म, भक्ती आणि भगवंताच्या विविध अवतारांचे महत्त्व भाविकांना समजावून सांगितले.


विश्वरचना, लोकांची रचना, भरत महाराजांची कथा तसेच मानवी जीवनातील कर्माचे महत्त्व स्पष्ट केले. मनुष्याने विषयभोगात अडकून न राहता परमात्म्याचे चिंतन करावे आणि जीवनाचे अंतिम ध्येय समजून घ्यावे, असा संदेश त्यांनी दिला.

कर्मानुसार मिळणाऱ्या फळांचा आणि नरकगतीचा उल्लेख करण्यात आला. मनुष्याने केलेल्या पापकर्मांचे परिणाम भोगावे लागतात. भागवतामध्ये वर्णन केलेल्या सत्तावीस प्रकारच्या नरकांचे विवेचन करताना वाईट कर्म, हिंसा, अन्याय, फसवणूक आणि अधर्म यापासून दूर राहण्याचे आवाहन महाराजांनी केले. भगवंताचे नामस्मरण आणि प्रामाणिक आचरण हे जीवनाला योग्य दिशा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले. भक्त प्रल्हादाचे चरित्र सांगताना प्रतिकूल परिस्थितीतही भक्ती आणि श्रद्धा सोडू नये, हा संदेश देण्यात आला. हिरण्यकशिपूच्या अत्याचारासमोर प्रल्हादाची भगवंतावरील अढळ निष्ठा आणि भगवान श्रीनृसिंहांचा अवतार यांचे वर्णन करताना भक्तीची शक्ती अधोरेखित करण्यात आली.

गजेंद्रमोक्ष, समुद्रमंथन आणि भगवान विष्णूंच्या विविध अवतारांचे महत्त्व सांगण्यात आले. संकटाच्या काळात अहंकाराचा त्याग करून भगवंताला शरण जाणाऱ्या भक्ताचे रक्षण करण्यासाठी परमात्मा धावून येतो. विविध राजर्षींची वंशपरंपरा, धर्माचरण आणि भगवान श्रीरामांच्या चरित्राचे महत्त्व सांगण्यात आले. राजसत्ता असो अथवा सामान्य जीवन, प्रत्येकाने कर्तव्य, सत्य, त्याग आणि मर्यादा यांचा स्वीकार केला पाहिजे, असा संदेश महाराजांनी दिला.

मनुष्याने निसर्गाशी समतोल राखून जीवन जगणे आवश्यक आहे. निसर्गाचा अवमान, पर्यावरणाची हानी आणि अनियंत्रित मानवी हस्तक्षेप यांचे दुष्परिणाम समाजाला भोगावे लागू शकतात. म्हणूनच 'जशी क्रिया, तशी प्रतिक्रिया' हा कर्मसिद्धांत प्रत्येकाने जीवनात आचरणात आणावा, असे आवाहन महंत रामगिरी महाराज यांनी केले. दरम्यान कथेस पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, राघवनंदगिरी महाराज यांनी भेट दिली.

यावेळी कारखान्याचे संचालक सुहास गोडगे, प्रवीण विभुते, मधुकर महाराज, रामभाऊ महाराज, चंद्रकांत महाराज, कामगार वर्ग यांचेसह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# भडकेवस्ती शाळेला सिद्धिविनायक प्रतिष्ठानकडून स्मार्ट टीव्ही भेट

## आमदार अक्षय कर्डीले यांच्या हस्ते हस्तांतरण



**● तिसगाव । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दर्जेदार व प्रभावी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने तिसगाव येथील सिद्धिविनायक प्रतिष्ठानच्या वतीने भडकेवस्ती शाळेला स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आला. गणेशोत्सवाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात आमदार अक्षय कर्डीले यांच्या हस्ते स्मार्ट टीव्ही शाळेला सुपूर्द करण्यात आला.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते काशीनाथ पा. लवांडे, माजी जिल्हा परिषद सदस्य पुरुषोत्तम आठरे, पंचायत समिती सदस्य सुनील परदेशी, तिसगावचे सरपंच इलियास शेख, उपसरपंच पंकज मगर, डॉ. बाळकृष्ण मरकड, बाळासाहेब लवांडे, माधवराव लोखंडे, अरुण रायकर, सचिन नेहुल, ग्रामपंचायत सदस्य अमोल भुजबळ, सचिन साळवे, धीरज मैड आदी उपस्थित होते.

स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व्हिडिओ, डिजिटल अभ्यासक्रम आणि दृकश्राव्य शैक्षणिक साहित्याचा वापर करून अधिक रंजक पद्धतीने शिक्षण घेता येणार आहे. ग्रामीण भागातील शाळांना आधुनिक शैक्षणिक साधने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिद्धिविनायक प्रतिष्ठानचा हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

डिजिटल क्रांतीच्या या युगात ग्रामीण व स्थानिक पातळीवरील शाळांना अशा प्रकारे तांत्रिक साहित्याची मदत मिळणे अत्यंत गरजेचे आहे. अशा उपक्रमांमुळे गरीब व गरजू विद्यार्थ्यांपर्यंत आधुनिक दर्जाचे शिक्षण पोहोचण्यास मोठी मदत होईल, असे मत आमदार अक्षय कर्डीले यांनी व्यक्त केले.

यावेळी सिद्धिविनायक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोमनाथ कातखडे, उपाध्यक्ष कल्याण लवांडे, महेश लोखंडे, योगेश मैड, सोमनाथ वांढेकर, लक्ष्मण गवळी, गणेश लवांडे, देविदास माने, यशपाल गांधी, सुनील शिंदे, राहुल भापसे, तुषार नांगरे, बाळासाहेब गुगळे, लक्ष्मण नांगरे, संदीप बर्डे, बाळासाहेब म्हस्के, बाळासाहेब खामकर, रवी पालवे, प्रशांत शिंदे, गणेश जंगम, विकास सातपुते, संदीप पाठक, गणेश उंडाळे, राजू भडके, अनंत जाधव, निलेश गारदे, वसंत होळकर, संतोष जेजूरकर, प्रणील सावंत, रामभाऊ अकोलकर, खुशवंत ससाणे, सागर भडके तसेच शाळेचे मुख्याध्यापक राज चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बस चालक हे पालकांनी त्यांच्यावर ठेवलेल्या विश्वासाची जबाबदारी : प्रकाश गवळी

**● कोपरगाव । वीरभूमी–**

ज्याप्रमाणे आपले आई – वडील आपल्या सुरक्षिततेची काळजी घेतात, त्याचप्रमाणे हे वाहनचालक दररोज आपल्या सुरक्षिततेची काळजी घेतात. विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे शाळेत आणणे आणि सुखरूप घरी पोहोचविणे ही केवळ त्यांची नोकरी नसून पालकांनी त्यांच्यावर ठेवलेल्या विश्वासाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य चालक – मालक महासंघाचे अध्यक्ष प्रकाश गवळी यांनी केले.



समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या संकल्पनेतून चालक दिन साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ५० बसचालकांचा विद्यार्थ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक काका कोयटे अध्यक्षस्थानी होते.

कोपरगाव तालुका ट्रक ड्रायव्हर–मालक वाहतूक संघटनेचे अध्यक्ष अय्युबभाई कच्ची, सचिव शैलेशशेठ रावल, वाहनचालक संघाचे मार्गदर्शक व सल्लागार सागर कस्तुरे, संचालक पांडुरंग राजे, स्कूलच्या उपप्राचार्या मोहिनी जगताप उपस्थित होते. विद्यार्थ्यांना घरातून शाळेत आणणे आणि शाळा सुटल्यानंतर त्यांना सुरक्षितपणे घरी पोहोचविण्याची जबाबदारी बसचालक पार पाडतात. त्यांच्या या सेवेमागील कर्तव्य भावनेची जाणीव ठेवत विद्यार्थ्यांनी चालक दिनानिमित्त त्यांचा सन्मान केला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि चालकांविषयीचा आदर दिसून आला.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना काका कोयटे म्हणाले, आम्ही वाहनचालकांकडे केवळ कर्मचारी म्हणून पाहत नाही, तर त्यांना आमच्या कुटुंबातील सदस्य मानतो. गेल्या अनेक वर्षांपासून अनेक चालक अत्यंत निष्ठेने समता परिवाराची सेवा करत आहेत. काही सहकारी तर तब्बल ३० वर्षांपासून आमच्यासोबत कार्यरत आहेत. त्यांच्या हातात केवळ वाहनाचे स्टेअरिंग नसते; त्यांच्या हाती विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची आणि पालकांच्या विश्वासाची अमूल्य जबाबदारी असते.

प्राचार्य समीर अत्तार म्हणाले, ज्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करताना त्याला योग्य दिशा दिली, त्याचप्रमाणे आपल्या वाहनचालकांच्या हातात विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाची जबाबदारी आहे. ते केवळ वाहन चालवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचे सारथी म्हणून कार्य करतात. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्वेताली सदाफळ यांनी केले.

# अकोले तालुक्यात रेल्वेची शिटी वाजेल का?

## वक्तृत्व स्पर्धेत लहित खुर्द च्या लेकीने विचारला थेट सवाल !। व्हिडिओ व्हायरल

**● अकोले । वीरभूमी–**



अंधारकडून उजेडाकडे येणारा मार्ग आम्हाला हवाय.. आमच्या या भागाला विकासाचा नवा स्पर्श हवा आहे.. केवळ आश्वासन नकोय, कृतीची साथ हवीय.. गती आणि प्रगती साठी आम्हाला रेल्वे हवी..हीच आमची मागणी आहे. असे शासन प्रशासन लोकप्रतिनिधी यांना खडे बोल सुनावत आमच्या अकोले तालुक्यात रेल्वेची शिट्टी वाजणार. का? असा सवाल लहित खुर्द येथील धनश्री नितीन बराते या विद्यार्थिनीने विचारला. निमित्त होते राष्ट्रसेवा दलाने विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या साथी ॲड. अब्दुल शेख वक्तृत्व स्पर्धेचे.

धनश्री लहित मधील आदर्श माध्यमिक विद्यालयात शिकत आहे. आम्हाला रेल्वे हवीच हा तिच्या भाषणाचा विषय होता.

सह्याद्रीच्या कुशीत निसर्गाने वरदान दिलेला अकोले तालुका हा ऐतिहासिक आणि क्रांतिकारक विचारांचा तालुका आहे. परंतु दुर्दैवाने ७५ वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरहीहा तालुका रेल्वेच्या नकाशावर आलेला नाही या बद्दल तीव्र शब्दात नाराजी व खंत व्यक्त करतानाच विकासासाठी रेल्वे का हवी हे प्रभावीपणे मांडले. तिचे हे भाषण सोशल मीडियात व्हायरल झाले आहे.

तालुक्याच्या दृष्टीने जिव्हाळ्याच्या असणाऱ्या रेल्वे च्या प्रश्नावर बोलताना ती पुढे म्हणाली की, तालुक्याला पर्यटन स्थळे आहेत, कष्टकरी शेतकरी आहेत, शेतात टोमॅटो, भाजीपाला, भात शेती सारखे पिके घेतली जातात, परंतु त्याला मुंबई, पुणे सुरत सारख्या ठिकाणी बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी स्वस्त आणि जलद सेवा देण्यासाठी रेल्वे नाही त्यामुळे वाहतुकीवर मोठा खर्च होतो, शेतमाल बाजारात नेण्यासाठी उशीर होत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. भाताची शेती, दुधाची गंगा, रेल्वे अभावी होतोय आमचा पंगा..रेल्वे आली तर पर्यटक अकोले तालुक्यात येतील. स्थानिक लोकांना रोजगार मिळेल. सामान्य लोकांना जाण्यायेण्यासाठी सोय, वैद्यकीय उपचार असोत किंवा शिक्षण, नोकरीसाठी शहरात जाण्यायेण्यासाठी रेल्वेची गरज आहे. विकासाची फळे ही मोठ्या शहरापूर्ती मर्यादित न राहता ग्रामीण भागातील सर्व सामान्य नागरिकांना प्रवासाची मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी, होणारे अपघात आणि वाढते इंधनाचे दर यावर एकमेव शाश्वत उपाय म्हणजे रेल्वे होय.

# वीरभूमी गणपती बाप्पा मोरया

# 'सेल्फी विथ गणेशा'



■ वीरभूमी–'सेल्फी विथ गणेशा' : सौ. ज्योती दळे व कु. वैष्णवी दळे, रा. कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी–'सेल्फी विथ गणेशा' : द्रोपदाबाई शेळके, रा. कासार पिंपळगाव, पाथर्डी, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी–'सेल्फी विथ गणेशा' : ईश्वरी सोमनाथ सोनवणे, रा. खेडकर वस्ती, सामनगाव, ता. शेवगाव



■ वीरभूमी– कोपरगाव येथील शाम जंगम यांनी गौरीच्या आगमना वेळी केलेली महांकालेश्वर महादेव आरास.



■ वीरभूमी–'सेल्फी विथ गणेशा' : जय भगवान युवा प्रतिष्ठान, नारायणनगर, खेडकर वस्ती, रा. सामनगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर



■ वीरभूमी–'सेल्फी विथ गणेशा' : राजेंद्र जाधव, गणेश जाधव व परिवार, रा. पिंपरी चिंचवड, पुणे